
## We are Proud of our Alumni!!

## आम्हांला आमच्या विद्यार्थ्यांचा सार्थ अभिमान आहे.








**Mr. Vinit M Barhate, Completed Diploma in Mechnaical Engineering from Batch 2014-15 MET's Institute of Technology-Polytechnic, Nashik and** as a Currently working**Assistant System Engineer** at**Tata Consultancy Services**Ltd ., **Pune**

टाटा (TATA) समूहाच्या, देशभरांत पसरलेल्या विविध कंपन्या, उपकंपन्या, त्यांतल्या कर्मचाऱ्यांचं वेतन, आर्थिक देणी व व्यवहार असा सगळा व्याप पाहता , त्यांची सर्व माहिती व्यवस्थित साठवून ठेवणं जिकिरीचं पण आवश्यक काम होतं . अशा वेळी ही माहिती पारंपरिक पद्धतीने फाईल मध्ये न साठवता , संगणकाच्या मदतीने एकत्र करण्यासाठी सर जे . आर .डी . टाटा यांनी १९६८ मध्ये संगणकीय कामांसाठी सुरु ;केलेला स्वतंत्र विभाग म्हणजेच आजचा , टाटा कन्सल्टिंग सर्व्हिसेस (TCS) हा उद्योग.

देशाच्या औद्योगिक धोरणात, माहिती व तंत्रज्ञान ही शाखा अनोळखी असण्याचा तो काळ. त्यावेळी भारतातील विद्यापीठातसुद्धा संगणक विज्ञान हा विभाग अस्तित्वात नव्हता. आय. आय. टी . कानपूर, या संस्थेत पहील्यांदा संगणक अभियांत्रिकी हा अभ्यासक्रम सुरु करण्यात आला. अशा काळात TCS ने आय. आय. टी . कानपूर, येथे निवड प्रक्रिया राबवून , पात्र अभियंत्यांची निवड आपल्या नव्या संगणक विभागासाठी केली होती. १९७० साली इंटरनेट सुविधा सुद्धा अस्तित्वात नसण्याच्या काळात TCS ने भारत व अमेरिका या देशांतील वेळेच्या तफावतीचा लाभ उठवत भारतातून, अमेरिकन कंपन्यांसाठी काम करण्यास सुरुवात केली व एक नवं तंत्रज्ञान उदयास आलं , जो आजच्या काळात परवलीचा शब्द बनला आहे, तो म्हणजे "बीसीनेस प्रोसेस आउटसोर्सिंग" (BPO).

२००२ या वर्षी TCS ही १०० कोटी डॉलर्सचा पल्ला गाठणारी देशांतील पहिली आय .टी . कंपनी बनली. त्या आर्थिक वर्षांत , TCS ने एक अब्ज डॉलर उत्पन्नाचा विक्रम नोंदवला होता. याच काळांत, जगातल्या सर्वात मोठया १० कंपन्यांपैकी ६ कंपन्या TCS ची सेवा घेत होत्या. सद्य स्थितीत, TCS ही भारतातील सर्वात मोठी बहुराष्ट्रीय आय. टी . कंपनी असून, कंपनीचा विस्तार जगभरातील ४६ देशांत झाला आहे.

भारतीय रेल्वे, भारतीय सैन्यदल व भारतीय पोस्ट या सरकारी संस्थानंतर, TCS ही सर्वाधिक कर्मचारी संख्या असणारी देशातील चौथ्या क्रमांकाची कंपनी असून, सध्या TCS मध्ये जगभरातून, ४,४६,६७५ कर्मचारी कार्यरत आहेत. TCS ही देशातील सर्वाधिक महिला कर्मचारी ३६.२ % असणारी एकमेव कंपनी आहे. वार्षिक आर्थिक प्रगती व एकूण महसुलाचा विचार करता, TCS ही, आय. टी . सेक्टर मधील , जगातील ९ व्या क्रमांकाची मोठी कंपनी असून,जागतिक सार्वत्रिक फोर्ब्ज च्या उद्योगांच्या यादीत ६४ व्या क्रमांकावर आहे.

एकूणच टाटा समूहा सारख्या महाकाय , प्रतिष्ठित व सामाजिक बांधिलकीला प्राधान्य देणाऱ्या राष्ट्रप्रेमी उद्योग समूहाची TCS ही स्वतंत्र उपशाखा असून, सध्याच्या कोविड १९ प्रादुर्भावाच्या काळात देखील,आपण या उद्योगसमूहाच्या सामाजिक जाणिवेचा व उदार

मूल्यांचा अनुभव घेतला आहे. हा सर्व आढावा घेण्याचं कारण, **श्री. विनीत मधुकर बारहाते,** हा मेट पॉलीटेचनिकच्या, यंत्र अभियांत्रिकी विभागाचा शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मधील उत्तीर्ण विद्यार्थी.

दि. ८ ऑगस्ट २०१८ रोजी, विनीतची TCS मध्ये असिस्टन्ट सिस्टिम इंजिनीअर म्हणून निवड झाली. निवडीनंतर चेन्नई येथील,३० दिवसांच्या विशेष प्रशिक्षणानंतर २७ नोव्हेंबर २०१९ मध्ये, त्याची नियुक्ती TCS च्या पुणे येथील शाखेत करण्यात आली. सध्या तो, TCS च्या Manufacturing Domain मध्ये, USA च्या Truck Manufacturing Industry प्रकल्पावर मॅन्युअल व ऑटोमेशन सॉफ्टवेअर टेस्टर म्हणून कार्यरत आहे.

विनीत हा भुसावळ (जि .जळगाव) येथील मध्यम वर्गीय कुटुंबातून आलेला विद्यार्थी. त्याचे वडील श्री. मधुकर बारहाते, हे भारतीय रेल्वेच्या, भुसावळ स्थित केंद्रीय रेल्वे कार्यशाळेत कार्यरत असून, आई गृहिणी आहे. विनीत हा तीन बहिणींच्या पाठचा , सर्वात धाकटा. नावाप्रमाणेच विनयी, नम्र, मितभाषी आणि हुशार. त्याच्या आई वडिलांनी या भावंडांना अत्यंत मेहनतीने व कष्टाने शिकवले, त्यामुळेच आज त्याच्या तीनही थोरल्या बहिणी उच्चविद्याविभूषित असून, स्वतःच्या पायावर उभ्या आहेत. दहावीला ८८ %, डिप्लोमा ला ८२.९४ % व पदवीला ८२.५३ % गुण मिळवत, विनीतने देखील आपला शैक्षणिक आलेख सतत उंचावत ठेवला.

मेट पॉलीटेकनिक च्या मेकॅनिकल विभागांत , विनीत दाखल झाल्यानंतर, अंत्यंत मेहनतीने व चिकाटीने त्याने अभ्यासक्रमासोबतच, विभागाच्या विविध उपक्रमांत सहभाग घेत, आपल्या व्यक्तिमत्व विकासावर भर दिला. उपजतच असलेल्या गणिताच्या आवडीतून, त्याने "जिज्ञासा" या प्रादेशिक स्तरावर घेतल्या जाणाऱ्या गणितीय स्पर्धेत भाग घेत, ७३. १६% गुण मिळवत यश संपादन केले. त्यासोबतच विभागाकडून सातत्याने, अभ्यासक्रमाशी निगडित नवीन तंत्रज्ञानावर, विद्यार्थ्यांसाठी घेण्यात येणाऱ्या प्रशिक्षण कार्यक्रमांत तो उत्स्फूर्तपणे सहभागी होत असे. त्यात त्याने, Hydraulic & Pneumatics, PLC & Automation, Solid Modelling या विषयांवर विभागाने, अनुक्रमे प्रॉलिफीक सिस्टिम्स, मे . गवादे इलेक्ट्रीकल्स व टेकनॉकॅड या संस्थांसोबत आयोजित प्रत्येकी ३ दिवसांच्या प्रशिक्षण कार्यशाळेत सहभाग नोंदवला होता.

यंत्र अभियांत्रिकीतून पदविका अभ्यासक्रम विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाल्यानंतर, त्याने पुणे विद्यापीठअंतर्गत पदवि अभ्यास क्रमाला प्रवेश मिळवला. पदवी अभ्यासक्रम काळात, तो Fluid Power Society of India, Society of Automotive Engineers, Indian Society of HVAC Engineers या संस्थांचा सदस्य होता. तिथेही अभ्यासक्रमासोबतच त्याने इतर उपक्रमांत सहभाग घेत पदवी अभ्यासक्रम पूर्ण केला. याच काळात त्याने, जपानी भाषा (N -5 Level) अवगत केली. शैक्षणिक कालावधीतील या सर्वांचा उपयोग त्याला त्याच्या व्यावसायिक कारकिर्दीसाठी झाल्याचं तो आवर्जून नमूद करतो.

आपले स्वानुभव विद्यार्थ्यांसमोर मांडताना, विद्यार्थ्यांना त्याचे सांगणे आहे की , "शैक्षणिक काळात तुमचा दृष्टिकोन व्यापक करत पुढील शैक्षणिक ध्येय आखून, त्यावर लक्ष केंद्रित करा. वेळेचं योग्य व्यवस्थापन करून, ते कसोशीने पाळत. आपले निर्धारित ध्येय गाठण्यावर भर द्या, आणि आपल्या आई -वडिलांचे कष्ट व पाठबळ कधीही विसरू नका. Always try to become master in at least one skill better than anyone else!!" थोडक्यात विनीत देखील महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या "Jack of all trades, and master of one " या नवीन अभ्यासक्रमातील ब्रीद वाक्याचं महत्व अधोरेखित करतो.

चांगल्या बदलांसाठी पुढाकार (Leading change), प्रत्येकाचा आदर (Respect of Individual), प्रामाणिकता व सचोटी (Integrity), उत्तमता (Excellence), शिकणे व वाटणे (Learning & Sharing) यांचा समावेश TCS च्या नैतिक मुल्यांमध्ये (Core Values) केला गेला असून, "Experience Certainty" ही TCS ची टॅग लाईन आहे. विनितही टाटा समूहाच्या या नैतिक मूल्यांच्या आचरणातून, खात्रीलायक,निश्चित व शाश्वत अशा यशासाठी सद्सद्विवेकबुद्धीने सहभागी होत आपली प्रगती साधेल, याची खात्री आहे. विनितला त्याच्या भावी यशस्वी कारकिर्दीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा !!

**अमोल पुरुषोत्तम वडनेरे,**
विभागप्रमुख-यंत्र अभियांत्रिकी विभाग,
मेट पॉलीटेकनिक-भुजबळ नॉलेज सिटी, नाशिक.

MECH | Spandan

Bhujbal Knowledge City, IOT-Polytechnic